ज्ञापन.
ईमेलव्दारे.
तात्काळ/सर्वोच्च प्राधान्याने.

क्रमांक-आस्था/लिटं-समुपदेशनाने बदली/ ९३३-१९/४.
आयुक्त,
अन्न व औषध प्रशासन,म.राज्य,
३४१, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,
बांद्रा (पूर्व),मुंबई - ४०००५१.
दिनांक १३ मार्च,२०१९.

विषय-समुपदेशनाव्दारे बदलीबाबतचे धोरणानुसार लिपिक टंकलेखक संवर्गातील बदली प्रकिया.

संदर्भ-१. शासन, सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्रमांक एसआरव्हि-२००४/प्रक्र.१५/०४/१२, दिनांक २५ मे,२००६.
२. शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१७/ प्रक्र ४१५/कार्यासन १२, दिनांक ९ एप्रिल,२०१८.
३. शासन, सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक टीआरएफ- २०००/एम/८/ प्र.क्र.३/बारा, दिनांक ११/७/२०००

कार्यालय प्रमुख, अन्न व औषध प्रशासन,म.राज्य यांना कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ९/४/२०१८ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे समुपदेशनाव्दारे बदलीबाबतचे धोरण लागू केलेले आहे. प्रस्तुत शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे प्रशासनातील लिपिक टंकलेखक संवर्गातील दिनांक ३१/५/२०१८ रोजी नियतकालीन बदलीस पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी प्रपत्र-अ, रिक्त पदांची यादी प्रपत्र-ब व संभाव्य रिक्त पदांची यादी प्रपत्र-क मध्ये या ज्ञापना सोबत प्रसिध्द करण्यात येत आहे.

लिपिक टंकलेखक संवर्गातील जे कर्मचारी नियतकालीन बदलीकरीता प्राधान्यक्रम नमुद करतील त्यांनी त्याबाबत सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र व कागदपत्रांचे पुरावे जोडणे आवश्यक आहेत. सदर पुरावे जोडलेले नसल्यास अशा कर्मचा-यांचे प्राधान्यक्रम विचारात घेतले जाणार नाहीत.

प्रस्तुत ज्ञापन व त्यासोबतच्या प्रपत्र-अ, प्रपत्र-ब व प्रपत्र-क च्या प्रती त्यांचे कार्यालयाचे स्तरावर प्रसिध्द करुन, बदलीपात्र कर्मचा-यांना उपलब्ध करुन देण्यात याव्यात. संबंधित कर्मचा-यांकडून ज्ञापन प्राप्त झाल्याची पोच त्यांचे स्तरावर जतन करावी व त्याची प्रत प्रशासनास तात्काळ मेलव्दारे सादर करण्यात यावी. बदलीपात्र कर्मचा-यांना प्रस्तुत ज्ञापन व सहपत्रे प्राप्त न झाल्यास,त्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखांची राहिल.

दिनांक ९/४/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार अवघड क्षेत्र म्हणजे शासनाने वेळोवेळी घोषित केलेले राज्यातील आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्र तसेच सर्व विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या अधिपत्याखालील जिल्हयातील दळणवळणाच्या दृष्टिकोनातून दुर्गम व डोंगराळ भाग म्हणून घोषित केलेले क्षेत्र असे नमुद केलेले आहे.

प्रशासनातील गट क संवर्गातील सर्व पदे ही जिल्हा कार्यालयातील मुख्यालयात कार्यरत असतात, त्यांना कामकाजाचे कोणतेही कार्यक्षेत्र नेमून दिलेले नसते तसेच चंद्रपूर व

गडचिरोली हे जिल्हे आदिवासी व नक्षलग्रस्त असल्यामुळे तेथे कार्यरत कर्मचाऱ्यांना एक उच्चस्तरीय पदाची वेतनश्रेणी देय असते त्यामुळे गट क संवर्गाकरीता चंद्रपूर व गडचिरोली या दोन्ही जिल्हयांची अवघड क्षेत्रात गणना करण्यात आलेली आहे.

कार्यालय प्रमुखांनी त्यांचे अखत्यारीतील बदलीपात्र लिपिक टंकलेखक पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांकडून शासन निर्णय दिनांक ९/४/२०१८ मधील परिशिष्ट १ सोबतचे विवरणपत्र १ नुसार विहित केलेल्या नमुन्यांमध्ये दोन अवघड क्षेत्रातील पसंतीसह एकूण १० पसंतीक्रमाची माहिती प्राप्त करुन घेवून, परिपूर्ण माहिती भरलेली आहे याची शहानिशा करुन, दिनांक १५/४/२०१९ पर्यत बदलीपात्र कर्मचा-यांचे विवरणपत्र प्रशासनास प्राप्त होतील अशा पध्दतीने स्पीड पोस्ट/ईमेल व्दार caofdaest@gmail.com या ईमेलवर सादर करावी.

संदर्भिय शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

ज्या बदलीपात्र लिपिक टंकलेखक पदावर कार्यरत कर्मचा-यांकडून असा पसंतीक्रम प्राप्त होणार नाही त्यांचे बाबतीत शासन निर्णयातील नमुद कार्यपध्दतीनुसार कार्यवाही घेण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

मा.आयुक्तांचे मान्यतेने.

(ग.सु.परळीकर.)
सह आयुक्त (विधी)
अन्न व औषध प्रशासन,म.राज्य.

प्रति,
१.सह आयुक्त, बृहन्मुंबई विभाग, अन्न व औषध प्रशासन,म.राज्य, मुंबई.
२.सह आयुक्त, पुणे विभाग, अन्न व औषध प्रशासन,म.राज्य, पुणे.
३.सह आयुक्त, अमरावती विभाग, अन्न व औषध प्रशासन,म.राज्य, अमरावती.
४.सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,म.राज्य, जळगांव.
५.सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,म.राज्य, परभणी.
६.श्री.बा.दा.सावरकर, लिपिक टंकलेखक, अन्न व औषध प्रशासन,म.राजय,मुख्यालय.
(सहायक संचालक, अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, नागपूर यांचे मार्फत)
७. श्री.ग.थ.थोरात, लिपिक टंकलेखक, अन्न व औषध प्रशासन,म.राज्य मुख्यालय,
(प्रतिनियुक्तीने मा. प्रा.राम शिंदे, मा.मंत्रीमहोदय,यांचे आस्थापनेवर कार्यरत)
८.निवडनस्ती (का.क्र.४)

प्रपत्र-अ

साप्रवि, शानि .क्रमांक एसआरव्ही-२०१७/प्रक्र.४१५/का-१२/, दिनांक ९/४/१८ नुसार अन्न व औषध प्रशासन,म.राज्य, लिपिक टंकलेखक, गट-क पदावरील बदलीपात्र कर्मचा-यांची दिनांक ३१/५/१९ पर्यंतची ज्येष्ठतायादी.

| अ.क्र | वरिष्ठ लिपिकांचे नांव | बदली आदेशाचा दिनांक | वर्ष | महिने | कार्यरत ठिकाण | समान कालावधी असलेले कर्मचारी शासन सेवेत दाखल दिनांकापासून |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.बा.दा.सावरकर | २६/६/१२ | ७ | ११ | मुख्यालय (अचाप्र, नागपूर प्रतिनियुक्ती) | |
| २ | श्री.ग.थ.थोरात | २८/९/१२ | ६ | ८ | मुख्यालय मा.मंत्रीमहोदय मा.प्रा.राम शिंदे यांचे आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने | |
| ३ | श्री.सं.भि.लोढे | १४/६/१२ | ६ | ११ | बृहन्मुंबई | १४/६/१२ |
| ४ | श्रीमती सुचेता झळकीकर | २९/६/१२ | ६ | ११ | पुणे | २९/६/१२ |
| ५ | श्रीमती श्र.नि.मुदगल | ४/७/१२ | ६ | १० | अमरावती | ९/७/१२ |
| ६ | श्री.स.न.बारी | ४/७/१२ | ६ | १० | जळगांव | ११/७/१२ |
| ७ | श्री.ना.गो.कल्याणकर | २९/५/१३ | ६ | ० | परभणी | |

मा.आयुक्तांचे मान्यतेने.

(ग.सु.परळीकर.)
सह आयुक्त (विधी)
अन्न व औषध प्रशासन,म.राज्य.

E:\RHJ\RHJ-२०१९\बदली\लिपिक टंकलेखक.docx

प्रपत्र-ब

साप्रवि, शानि .क्रमांक एसआरव्ही-२०१७/प्रक्र.४१५/का-१२/, दिनांक ९/४/१८ नुसार अन्न व औषध प्रशासन,म.राज्य, दिनांक ३१/५/१९ रोजीची लिपिक टंकलेखक पदांची रिक्त पदसंख्या

| अ.क्र | जिल्हा कार्यालय | रिक्त पदे |
|---|---|---|
| 1 | मुख्यालय | १० |
| 2 | बृहन्मुंबई | २ |
| ३ | औनिप्र मुंबई | ५ |
| ५ | ठाणे | ३ |
| ६ | रत्नागीरी | २ |
| ७ | रायगड | २ |
| ८ | सिंधुदुर्ग | १ |
| ९ | नाशिक | ५ |
| १३ | पुणे | १ |
| १५ | सातारा | २ |
| १६ | कोल्हापूर | १ |
| १७ | सोलापूर | २ |
| १८ | औरंगाबाद | १ |
| १९ | जालना | १ |
| २२ | उस्मानाबाद | १ |
| २९ | वर्धा | १ |
| ३० | अमरावती | १ |
| ३२ | अकोला | १ |
| | एकूण | ४२ |

१. श्री.वि.वि.चव्हाण, लिपिक टंकलेखक, नागपूर यांचे वरिष्ठ लिपिक, परभणी या रिक्त पदावर पदोन्नतीचे आदेश निर्गमित केलेले आहेत आणि नागपूर कार्यालयाच्या कामकाजाच्या सोईच्या दृष्टिने त्यांना दिनांक ३१/३/१९ रोजी म.नं वरिष्ठ लिपिक,परभणी या पदावर रुजू होण्याकरीता कार्यमुक्त करण्याकरीता दिनांक ५/२/१९ रोजी ज्ञापन निर्गमित करण्यात आलेले आहे त्यामुळे ते वरिष्ठ लिपिक पदावर रुजू होताच लि पिक टंकलेखक, नागपूर १ पद रिक्त होईल.

२. श्रीमती वै.भि.देशपांडे, लिपिक टंकलेखक, कोल्हापूर याची वरिष्ठ लिपिक, सातारा या पदावर आणि श्री.ब्र.वा.काकड, लिपिक टंकलेखक, अकोला यांची वरिष्ठ लिपिक, नांदेड या पदावर पदोन्नतीने पदस्थापना करण्यात आलेली आहे तदनुसार लिपिक टंकलेखक,कोल्हापूर व अकोला हि पदे रिक्त झालेली आहेत. तथापि श्रीमती देशपांडे व श्री.काकड हे वरिष्ठ लिपिक पदावर अद्यापी रुजू झालेले नाहीत.

मा.आयुक्तांचे मान्यतेने.

(ग.सु.परळीकर.)
सह आयुक्त (विधी)
अन्न व औषध प्रशासन,म.राज्य.

प्रपत्र-क

साप्रवि, शानि .क्रमांक एसआरव्ही-२०१७/प्रक्र.४१५/का-१२/, दिनांक ९/४/१८ नुसार अन्न व औषध प्रशासन, म.राज्य, दिनांक ३१/५/१९ रोजीची लिपिक टंकलेखक पदांची संभाव्य रिक्त पदे.

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | अवघड बदल्यांमुळे रिक्त होणारी पदे | बिगर अवघड बदल्यांमुळे रिक्त होणारी पदे | सेवानिवृत्ती | प्रतिनियुक्ती | राजीनामा | पदोन्नती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्यालय | ० | २ | ० | ० | ० | ० |
| २ | बृहन्मुंबई | ० | १ | ० | ० | ० | ० |
| ३ | पुणे | ० | १ | ० | ० | ० | ० |
| ४ | अमरावती | ० | १ | ० | ० | ० | ० |
| ५ | जळगांव | ० | १ | ० | ० | ० | ० |
| ६ | परभणी | ० | १ | ० | ० | ० | ० |

मा.आयुक्तांचे मान्यतेने.

(ग.सु.परळीकर.)
सह आयुक्त (विधी)
अन्न व औषध प्रशासन,म.राज्य.